**B.K. BIRLA CENTRE FOR EDUCATION**
SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS
A CBSE DAY-CUM-BOYS' RESIDENTIAL SCHOOL

**PER BOARD EXAMINATION-3(2025-26)**
**MARATHI- SET ONE**

Class : X — Duration : **3** Hrs
Date : 09.01.2026 — Max. Marks : **80**
Admission No.: — Roll No.:

---

कृतिपत्रिकेसाठी सूचना :

**(1) या प्रश्नपत्रिकेत अ, ब, क, ड असे चार विभाग आहेत.**
**(2) सर्व विभाग आवश्यक आहेत.**
**(3) यथाशक्य सर्व विभागाची उत्तरे क्रमाने यावीत.**
**(4) एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच यावीत**

---

## विभाग (अ) वाचन व आकलन गुण (15)

**प्र 1 :– (आकलन ) अ: अपठित गद्यांश :–**

तथागत गौतम बुद्ध कोणत्याही प्रसंगी शांत,प्रसन्न असत. त्यांच्या या गुणांमुळे लोक त्यांना खूप मान देत, पण काही विरोधकांना हे सर्व सहन होत नसे. असाच एक माणूस एकदा गौतमांना रागवण्यास भाग पाडायचे, त्यांचा अपमान करायचा या उद्देशाने त्यांच्या प्रवचनाच्या ठिकाणी आला.

खूपच लोक जमले होते. तथागत शांतपणे त्या समुदायाला मार्गदर्शन करत होते. तेव्हा या माणसाने तेथे शिव्या दिल्या. जमलेले लोक खूप अस्वस्थ झाले, संतापलेही, त्याला मारायलाही धावले. पण तथागत मात्र शांत होते .त्यांनी लोकांनाही शांत केले. त्याच्या चेहऱ्यावरील हास्य ही तसेच होते. तो माणूस अद्वा–तद्वा शिव्या शाप देत होता. बऱ्याच वेळाने तो थकून थांबला आणि डोळे ताणून गौतमांकडे पाहत राहिला. तथागत शांत स्वरात म्हणाले, मी तुला एक प्रश्न विचारू का? विचारा तो माणूस गुरगुरला जर तुला कोणी एखादी वस्तू भेट दिली आणि ती भेट स्वीकारण्यास तू नकार दिलास तर त्या भेटीवर मालकी कुणाची?

इतकही कळत नाही? सोपं आहे, ती वस्तू त्या देणाऱ्याकडेच राहिल. तो माणूस म्हणाला. अगदी बरोबर!तथागत स्मित करीत म्हणाले, मग जर मी तुझे हे शिव्याशाप स्वीकारण्यास नकार दिला, तर ते कोणाकडे राहतील? तो माणूस सुन्न झाला आणि तथागतांच्या चरणी लागला.

जगात कोण आपल्याला काय बोलेल यावर आपण नियंत्रण ठेवू शकत नाही. पण त्याच्या स्तुती–शापांचा स्वीकार करणे न करणे हे पूर्णपणे आपल्याच हाती असते. आपण स्वतःचा अपमान करून घ्यायचा म्हटला तर तो घोर अपमान होऊ शकतो, अन्यथा ते केवळ शब्दांचे बुडबुडे असतात . कार्यालयात, समाजात किंवा अन्य ठिकाणी वावरताना हे जर लक्षात ठेवले तर माणसाचा त्रास खूपच कमी होऊ शकतो.

**प्र 1 (अ) खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा:–(कोणतेही पाच) (5X1=5)**

**1** तो माणूस –––––– शिव्याशाप देत होता.
- **अ** विनाकारण
- **ब** रागावून
- **क** उगाचच
- **ड** अद्वा–तद्वा

**2** प्रवचनात तथागत काय करत होते ?
- **अ** भजन कीर्तन
- **ब** भाषण
- **क** समुदायाला मार्गदर्शन
- **ड** समुदायाची कानउघडणी

**3** सुन्न झालेल्या विरोधकांची प्रतिक्रिया काय होती ?
- **अ** त्यांनी तथागतांना नमस्कार केला.
- **ब** तो तथागतांच्या चरणी लागला.
- **क** त्याने तथागतांची क्षमा मागितली.
- **ड** तो रडू लागला.

4 लोकांच्या कोणत्या गोष्टींचा स्वीकार करणे न करणे हे आपल्या हाती असते?

**अ** कौतुकाचा **ब** रागाचा

**क** स्तुती–शापांचा **ड** ग्रथसंपदा

5 लोक त्यांना का मान देत ?

**अ** गुणांमुळे **ब** आदरामुळे

**क** चांगुलपणामुळे **ड** प्रेमामुळे

6 गौतम बुद्ध कोणत्याही प्रसंगी कसे असत?

**अ** शांत व धैर्यवान **ब** शांत व कार्यशील

**क** शांत व प्रसन्न **ड** शांत व क्रोधीत

**प्र 1 (ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :–(कोणतेही तीन) (3X1=3)**

1 गौतम बुद्ध यांच्या विरोधकांना काय सहन होत नसे?

2 आपण कशावर नियंत्रण ठेवू शकत नाही?

3 जनसमुदायातील काही माणसे त्या विरोधकाला मारायला का धावली?

4 विरोधक कोणत्या उद्देशाने तथागतांच्या प्रवचनाच्या ठिकाणी आला?

**प्र 2 (आकलन ) अपठित पद्यांश :–**

**प्र 2 (अ) खालील कविता काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :–**

**प्र 2 (अ) कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा :–(कोणतेहीचार(4X1=4)**

कुंभारा सारखा गुरु नाही रे जगात
वरि घालितो धपाटा, आत आधाराला हात
आधी तुडवी तुडवी मग हाते कुरवाळी
ओल्या मातीच्या गोळयाला येई आकृती वेगळी
घट जाती थोराघरी,घट जाती राऊळात
कोणी चढून बसतो गावगौरीच्या मस्तकी
कुणी मदयपात्र होतो रावराजाच्या हस्तकी
आव्यातली आग नाही पुन्हा आठवत
कुणी पुजेचा कलश, कुणी गोरसाचा माठ
देता आकार गुरुने ज्याची त्याला लाभे वाट
घट पावती प्रतिष्ठा गुरु राहतो अज्ञात

1 खालील पैकी कोणत्या ठिकाणी घट जात नाही?

**अ** थोरा घरी **ब** राऊळात

**क** राजाच्या हातात **ड** गवळणींच्या मस्तकावर

2 कलश कशासाठी उपयोगात आणला जातो ?

**अ** पूजेसाठी **ब** पाणी भरण्यासाठी

**क** दूध ठेवण्यासाठी **ड** झाडे लावण्यासाठी

3 **दूध** या अर्थाचा कोणता शब्द कवितेत आला आहे?

**अ** कलश **ब** माठ

**क** गोरस **ड** घट

4 कुंभाराच्या उदाहरणावरून कवीला कोणाचे महत्त्व सांगायचे आहे?

**अ** शिष्याचे **ब** गुरूचे

**क** कुंभाराचे **ड** नशिबाचे

5 कुंभारासारखा गुरू नाही रे जगात शब्दयोगी अव्यय शोधा?

**अ** सारखा **ब** नाही

**क** रे **ड** गुरू

**प्र 2 (ब) एका वाक्यात उत्तरे लिहा :–(कोणतेही तीन) (3X1=3)**

1 कोण अज्ञात राहतो ?
2 कशाला आकृती प्राप्त होते?
3 गुरूने आकार देताच काय घडले?
4 कोणासारखा गुरू जगात नाही असे कवी म्हणतात?
5 आधी तुडवा तुडवी झाल्यावर नंतर काय होते?.

## विभाग :– ब ( 20 गुण)

**प्र 3 (अ) शब्दांच्या जाती ओळखा :– (कोणतेही चार)** **(4X1=4)**

1 खालील पर्यायातून विशेष नामाचा योग्य पर्याय निवडा :–
**अ** राधिका **ब** समुद्र
**क** नदी **ड** वृक्ष

2 पुढे दिलेली कोणती विधाने बरोबर आहेत?
1 क्रियापद म्हणजे वाक्याच्या शेवटीच येणारा शब्द.
2 क्रियापद म्हणजे वाक्यातील कृतीदर्शक शब्द.
3 क्रियापद म्हणजे वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा शब्द.
4 क्रियापद हे वाक्यातील कर्त्यानुसार बदलते.
**अ** विधान अ–ब बरोबर क–ड चूक. **ब** विधान अ–ब–ब बरोबर ड चूक
**क** विधान ब–क–ड बरोबर अ चूक **ड** विधान क–ड बरोबर अ–ब चूक

3 खालील पैकी गटात न बसणारे वाक्य कोणते?
**अ** अबब!केवढी उंच इमारत ही! **ब** खाल्लीस का माती तू?
**क** अरे देवा! चुकल की तुझं गणित! **ड** छी!किती घाणेरडा हा शर्ट.

4 पुढील वाक्यात रिकाम्या जागी योग्य क्रियाविशेषण अव्ययाचा वापर करा.
नदीच्या –––एक भले मोठे अरण्य होते.
**अ** पाठीमागे **ब** पलीकडे
**क** इकडे **ड** खाली

5 वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.
देवाची प्रार्थना मना<u>पासून</u> करावी.
**अ** अभयान्वयी अव्यय **ब** सर्वनाम
**क** विशेषण **ड** शब्दयोगी अव्यय

**प्र 3 (ब) काळ ओळखा व बदला ( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1 शिक्षण पूर्ण झाल्यावर लगेचच नोकरी मिळेल.( वाक्याचा काळ ओळखा)
2 हरवलेल्या माणसाच्या आठवणीने मन सैरभैर झाले. ( भविष्यकालिन वाक्य तयार करा)
3 पावसाळयात रहदारीचा खोळंबा होईल.( वर्तमानकालीन वाक्य तयार करा )
4 पोटभर जेवल्याने भावेशला बरे वाटते.(भूतकालीन वाक्य तयार करा )

**प्र 3 (क) वाक्याचे प्रकार ओळखा ( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1 औषध घेतल्यावर गोकुळला बरे वाटले का? ( वाक्याचा प्रकार ओळखा)
2 विश्वासला दिलेली शिक्षा मान्य नाही.( होकारार्थी वाक्यात रुपांतर करा )
3 मुलांनी सूचनांचे पालन करावे. ( आज्ञार्थी वाक्य तयार करा)
4 तुझे अक्षर खूप अशुध्द आहे.( उद्‌गारार्थी वाक्य तयार करा)

**प्र 3 (ड) समानार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 खालील पैकी गटात न बसणारा शब्द कोणता?
**अ** धरणी **ब** पृथ्वी
**क** अवनी **ड** लोचन

2 खालील पैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?

अ कामगार	ब कौशल्य
क कसब	ड निपुणता

3 खालील पैकी गटात न बसणारा शब्द कोणता?

अ द्रव्य	ब धन
क संपत्ती	ड घनदाट

**प्र 4 (अ) विरुध्दार्थी शब्द ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 खालील पैकी विरूध्दार्थी शब्दाची योग्य जोडी कोणती?

अ दूर×लांब	ब शेवट×सांगता
क जमा×खर्च	ड स्तुती×प्रशंसा

2 **काळोख** या शब्दासाठी विरूध्दार्थी शब्द लिहा :–

3 **बंदिस्त** या शब्दासाठी विरूध्दार्थी शब्द लिहा :–

**प्र 4 (ब) लिंग बदला ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 पुढील पैकी नपुसकलिंगी शब्दाचा पर्याय निवडा ?

अ टाकी	ब कपाट
क साबण	ड बांगडी

2 **जनक** या शब्दासाठी स्त्रीलिंगी शब्द कोणता?

3 लिंग विचारानुसार गटात न बसणारा शब्द कोणता?

अ कागद	ब डोंगर
क गाडी	ड रस्ता

**प्र 4(क) वचन बदला ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 खालील पैकी निश्तिपणे अनेकवचनी शब्द कोणता ?

अ सभा	ब गाडया
क देव	ड पाय

2 खालील पैकी एकवचनी शब्द कोणता ?

अ तळी	ब गाणी
क खेळणे	ड किल्ले

3 **खुर्ची** या शब्दाला अनेकवचनी शब्द लिहा.

**प्र 4 (ड) समास ओळखा ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 खालीलपैकी समास प्रकाराच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता?

अ खेडोखेडी	ब प्रतिक्षण
क मीठभाकर	ड आजन्म

2 खालीलपैकी समास प्रकाराच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता?

अ पंधरावीस	ब स्पृश्यास्पृश्य
क मागेपुढे	ड हळदीकुंकू

3 ज्या समासात पहिले पद संख्या विशेषण असून त्या सामाकि शब्दावरून एका समुच्चयाचा अर्थ दर्शवला जातो त्या समासास काय म्हणतात.

## विभाग–क पाठयपुस्तक आधारित (30 गुण)

**प्र 5 (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही तीन) (3X1=3)**

1 निरंजन वार लावून का जेवायचा ?

2 लेखक रा.ग. जाधव रोज संध्याकाळी फिरावयास कोठे जात असत?

3 कवितेचं गाण्यात केव्हा रूपांतर होते?

4 कुटुंबाच्या कोणत्या कृतीने पंतांच्या वनजक्षय संकल्पाला सुरूंग लागला?

5 अभिषेकच्या बाबांनी कोणत्या गोष्टीबद्दल त्यांची मळमळ व्यक्त केली.?

**प्र 5 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा:– (कोणतेही तीन) (3X1=3)**

1 आता ———आल्याने रेल्वेचा छान पूल नदीवर आला.
2 आकर्षक ——— आणि परिणामकारक शेवट ही माझी वैशिष्टये .
3 आई हीच प्रत्येक मुलाची ———————असते.
4 स्वच्छतेची ——— असलेली स्नेहल त्यामुळे त्रासली होती.
5 अब्दुल तपोवनातील स्त्रियांना,मुलींना अगदी—————— वाटे.

**प्र 5 कः— खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहाः—** **(1X3=3)**

1 रंग साहित्याचे या पाठाच्या आधारे नाटक या साहित्यप्रकाराचा परिचय करून दया —
2 गोजिरी,गुलाबी पावलं असूनही पावडे काकांच्या पावलांचे ठसे ॲपवर काळे का उमटले, स्पष्ट कराः—.
3 लेखकाने भिक्षेकऱ्याला दिलेल्या शालीचा उपयोग त्याने का व कसा केला ?

**प्र 5 डः—खालील वाक्यांतील वाक्प्रचार ओळखा व त्याचा अर्थ कंसातील कोणत्या वाक्प्रचाराशी जुळतो ते लिहाः—** **(5X1=5)**

**( उसंत न लाभणे, बरबाद होणे, हातभार लावणे, आक्षेप नोंदवणे, गोडी लावणे )**

1 सेतूबंधनात खारूताईने श्रीरामाला मदत केली.
2 दिवाळीत आईला कामातून अजिबात वेळ मिळत नाही.
3 ब्रिटिशांनी अत्यावश्यक वस्तूंवर कर लावल्यावर भारतीय नेत्यांनी त्यावर हरकत घेतली.
4 हसतखेळत विज्ञान शिकवून जोशी सरांनी मुलांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण केली
5 अतिवृष्टीमुळे सगळी पिके वाया गेली.

**प्र 6 अ :— (अ) एका वाक्यात उत्तरे लिहाः— ( कोणतेही चार )** **(4X1=4)**

1 कवी सुर्वे यांचे वाट पाहण्यात किती दिवस गेले?
2 संत नामदेव कोणाचे अंकित दास आहेत?
3 फुलामुलांतून कोण हसत आहे?
4 देशवासियांच्या मुठीत कोणती गोष्ट नाही?
5 वणवा कोठे लागला आहे?

**प्र 6 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :—(कोणतेही चार)** **(4X1=4)**

1 जीव ओवाळावा तरी जीव किती हा ———
2 हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर —————————.
3 माता धावे ——————.
4 शेतामधुनी पिकवू —————.
5 —————— असे तुला एकच औक्षण.

**प्र 6 क) खालील काव्यपंक्तींचे संदर्भासहित स्पष्टीकरण कराः—(कोणतेही एक)** **(1X3=3)**

1 झोतभट्टीत शेकाचे पोलाद,
तसे आयुष्य छान शेकले

**किंवा**

फुलामुलांतून हसतो श्रावण
मातीचे हो मंगल तनमन
चैतन्याचे फिरे सुदर्शन
शेतामधुनी पिकवू मोती,धन हे अपरंपार।।

**प्र 7 अ स्थूलवाचन :— एका वाक्यात उत्तरे लिहा :— ( कोणतेही पाच )** **(5X1=5)**

1 अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात कोणत ठराव मंजूर करण्यात आला?
2 पाठामध्ये कोणत्या वाक्प्रचाराची व्युत्पत्ती सांगितली आहे?
3 डॉ. काकोडकर जेव्हा ट्रेनिंग स्कूलला गेले तेव्हा संस्था सुरू होऊन किती वर्षे झाली होती?
4 दार हा प्रत्यय कोणत्या भाषेतून मराठीत आला आहे?
5 स्काय इज द लिमिट असे कोण म्हणाले?

6 दुसऱ्या अनुभवातून डॉ काकोडकर कोणता धडा शिकले?

**विभाग– ड लेखन– (गुण 15)**

**प्र 8 (अ) दिलेले निबंध मुद्दे व कथा मुद्दे नीट वाचा व दिलेल्या पाच विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर 120 ते150 शब्दांत निबंध अथवा कथा लिहा :– (कोणतेही एक) (1X5=5)**

**निबंधविषयक मुद्दे**

**1 युद्भूमीवर धारार्थी पडू लागलेल्या सैनिकाचे मनोगत**

मुद्दे:–बालपण सुखात––सैन्य दलात भरती होण्याचे स्वप्न––योग्य प्रशिक्षण–– सेवेसाठी बांग्लादेश सीमेवर रूजू–––शत्रूचे भारतीय हद्दीत अतिक्रमण––जोरदार युद्ध––मरणासन्न अवस्था–– भारतमातेसाठी प्राणार्पण करण्याची वेळ––भारतमातेची अजून सेवा करू शकत नाही याचा खेद–– जयहिंद.

**2 परीक्षा रद्द झाल्या तर ......!**

**मुद्दे :–** शालेय जीवनातील सुखद क्षण मैत्री,दंगामस्ती आनंद––अभ्यासात आवड मात्र परीक्षा नको––रद्द झाल्यास तनाव रहित अभ्यास––उत्तीर्ण–अनुत्तीर्ण ताणच नाही–––पण याचे दुष्परिणाम––परीक्षांचे महत्त्व ––– परीक्षा तर हव्यात,मग त्या कशा?

**3 मी अनुभवलेला पावसाळयातील एक दिवस**

**मुद्दे :–** तीव्र उन्हाळा––– सर्व जण पावसाची वाट बघतात –– एक दिवशी अचानक सोसाटयाचा वारा––विजांचा कडकडाट––जोरदार पाऊस –– मातीचा वास –– आनंददायी वातावरण ––लहान मुलांचे पावसात भिजणे–– नोकरदारांची घरी परतण्यासाठी घाई––शेतकऱ्यांचा आनंद––पाऊस उघडताच पक्ष्यांचा किलबिलाट –वातावरणातील चैतन्य.

**किंवा**

**कथाविषयक मुद्दे. (शीर्षक आणि तात्पर्य आवश्यक)**

1 **मुद्दे :–** चुणचुणीत मुलगा––रेल्वे फाटकाजवळ झोपडी–– अभ्यासाची आवड––रात्री दिव्याखाली अभ्यास––अचानक मोठा आवाज–– धावत जाऊन पाहणे–– पावसामुळे रेल्वे रूळ खचणे––प्रसंगावधान––पटकन अंगातील शर्ट काढून रेल्वेच्या दिशेने धावणे––अनर्थ टळणे––रेल्वे खात्याकडून कौतुक ––राष्ट्रपतीच्या हस्ते सत्कार––तात्पर्य .

2 **मुद्दे:–**एक भले मोठे जलाशय ––आजूबाजूला घनदाट जंगल––जलाशयात अनेक मगरी––झाडावरील माकडांशी मैत्री ––माकडाचे काळीज खाण्याची इच्छा––गोड बोलून माकडाला फसविणे ––माकड अतिहुशार––काळीज झाडालाच टांगलेले–––युक्ती फळली––मगर निराश––तात्पर्य.

**प्र 8 (ब) पत्र लेखन :– ( लिफाफा आवश्यक) ( कोणतेही एक ) (1X5=5)**

विहान/वनीता चव्हाण,आदर्श महाविदयालय,पवनानगर,शिंदेवाडी,जि. सातारा येथून शाळेत गणेशोत्सव साजरा करण्यासाठी आवश्यक असलेल्या सजावटीच्या साहित्याची मागणी करणारे पत्र विविधा व्हरायटीज,रविवार पेठ,सावतामाळी चौक,सातारा यांना लिहित आहे..

**किंवा**

समीर/सानवी मराठे राहणार आकाश पॅरडाईज, राजवाडा मार्ग,मुंबई –10 येथून त्यांच्या विभागात अनियमित व कमी वीजपुरवठा होत असल्याची तक्रार मुंबई महानगरपालिका,वीजपुरवठा विभाग यांना पत्राद्वारे कळवत आहे.

**प्र 8 (क) खालील दिलेल्या विषयावर जाहिरात लेखन करा:– (1X5=5)**

1 स्वेटरच्या दुकानाची जाहिरात तयार करा –

**किंवा**

2 पतंगाच्या दुकानाची जाहिरात तयार करा :–

**:::::::::::::::::::: समाप्त ::::::::::::::::::::::::**